| MHGO040015862024 | न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, आमगांव यांच्या न्यायालयात, ता. आमगांव.<br>(पिठासीन अधिकारी श्री ए. आर. जोशी)<br>**[न्यायनिर्णय दि.०७/०५/२०२६]**<br>**नि.फ़ौ.ख.क्र. २०९/२०२४**<br>**कालावधीःव.०१,म.०४,दि.२९.** **नि. क्र.१६** |
|---|---|
| | ( गुन्हा क्र. २५७/२०२४, पोलीस स्टेशन, सालेकसा ) |

| | | |
|---|---|---|
| अभियोगपक्ष | | **महाराष्ट्र सरकारतर्फे**<br>पोलीस स्टेशन, सालेकसा,<br>ता. सालेकसा जि. गोंदिया |
| सहा. सरकारी वकील | | **विधिज्ञ श्री एम. के. बोरीकर.** |
| आरोपी | | **नितीन राजेश आचले,**<br>वय– २३ वर्षे, धंदा– मजूरी,<br>रा. पुराडा, जामुनटोला, ता. देवरी जि. गोंदिया. |
| आरोपी तर्फे वकील | | **विधिज्ञ श्री ए. एन. गुप्ता.** |

| | |
|---|---|
| घटना घडल्याचा दिनांक | दि. ०७.०८.२०२४. |
| प्रथम खबर अहवाल दिनांक | दि. १६.०८.२०२४. |
| फिर्यादची तारीख | दि. १६.०८.२०२४. |
| दोषारोपपत्र दाखल झाल्याची तारीख | दि. ०४.१२.२०२४. |
| फिर्याद दाखल तारीख | दि. ०९.१२.२०२४. |
| आरोपीवर दोषारोप ठेवल्याची तारीख | दि. १४.०२.२०२५. |
| पुरावा सुरू झाल्याची तारीख | दि. ११.०३.२०२६ |
| न्यायनिर्णय राखीव ठेवल्याची तारीख | -- |
| न्यायनिर्णय तारीख | दि. ०७.०५.२०२६. |
| आरोपीला शिक्षा सुनावल्याची तारीख | -- |

## आरोपीची माहिती

| | |
|---|---|
| आरोपीचे नाव | नितीन राजेश आचले, |

| | |
|---|---|
| **अटकेची तारीख** | -- |
| **आरोपीला जामिनावर सोडल्याची तारीख** | दि.०९.१२.२०२४. |
| **दोषारोप** | भा. न्या. स. कलम-३०३(२) प्रमाणे. |
| **शिक्षा देण्यात आली कि निर्दोष सोडण्यात आले** | निर्दोष सोडण्यात आले. |
| **देण्यात आलेली शिक्षा** | -- |
| **आरोपी केस दरम्यान किती दिवस तुरूंगात होता** | -- |

**<u>साक्षीदारांची यादी / बचावपक्ष / कोर्ट साक्षीदार</u>**

अ) **अभियोगपक्ष :**

| **सा. क्र.** | **साक्षीदाराचे नाव** | **साक्षीदार कोणत्या प्रकारातील आहे. (प्रत्यक्षदर्शी, पोलिस, वैद्यकिय अधिकारी, पंच)** |
|---|---|---|
| अ.सा.१ | टेकराम बजरहा पार्ते, | फिर्यादी सा. क्र. ०१ (नि. क्र. ०८) |

**ब) बचावपक्ष :**

| **सा. क्र.** | **साक्षीदाराचे नाव** | **साक्षीदार कोणत्या प्रकारातील आहे. (प्रत्यक्षदर्शी, पोलिस, वैद्यकिय अधिकारी, पंच, इतर)** |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**क) कोर्ट साक्षीदार:**

| **साक्षीदाराचे नाव** | **साक्षीदाराचे नाव** | **साक्षीदार कोणत्या प्रकारातील आहे. (प्रत्यक्षदर्शी, पोलिस, वैद्यकिय अधिकारी, पंच, इतर)** |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**<u>अभियोगपक्ष/ बचावपक्ष/ कोर्ट निशाणी क्र</u>.**

अ) **अभियोगपक्ष**

| **अ.क्र.** | **निशाणी क्र.** | **वर्णन** |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**ब) बचावपक्ष**

| **क्र.** | **निशाणी क्र.** | **वर्णन** |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**क) कोर्ट**

| क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**ड) मुद्देमाल**

| क्र. | मुद्देमाल क्र. | वर्णन |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**:: न्या य नि र्ण य ::**

**(दिनांक ०७ मे २०२६ रोजी घोषीत)**

प्रस्तुत खटला हा भारतीय न्याय संहिता कलम ३०३ (२) अन्वये आरोपीविरुध्द दाखल करण्यात आला आहे.

०२. अभियोगपक्षाचे वतीने मांडण्यात आलेली वस्तुस्थिती खालील प्रमाणे.

फिर्यादी टेकराम बजरहा पोर्ते यांनी अशी फिर्याद दिली आहे की, दिनांक ०७.०८.२०२४ रोजी १३:०० ते १३:४५ वाजतेच्या दरम्यान मौजा पुराडा, ता. देवरी जि. गोंदिया येथे आरोपी नामे नितीन आजेश आचले याने त्याच्या घराच्या आंगणात ठेवलेली फिर्यादीची मोटर सायकल एच. एफ. डिलक्स क्र. सी. जी.–जे.क्यु–६९१२ किंमत ८०,०००/– रुपयाचा माल त्याच्या संमतीशिवाय अप्रमाणिकपणे चोरी केले. म्हणून फिर्यादीने आरोपीविरुद्ध पोलीस स्टेशन सालेकसा येथे तोंडी रिपोर्ट दिली.

०३. फिर्यादवरुन सालेकसा पोलीस ठाण्यात गु.र.क्र. २५७/२०२४ नोंदविण्यात आला व गुन्ह्याचा तपास पो. हवा. शामकुमार डोंगरे यांच्याकडे देण्यात आला. तपासादरम्यान, त्यांनी घटनास्थळाचा पंचनामा, वाहनाचे कागदपत्र, साक्षीदारांची जबाब नोंदविली व आरोपीने गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्यामुळे त्यांच्याविरुध्द तपासाअंती दोषारोपत्र दाखल केले.

०४. आरोपपत्रावरुन दखल घेऊन या न्यायालयाने आरोपीविरूध्दभारतीय न्याय

संहिता कलम ३०३ (२) अन्वये दोषारोप नि. क्र. ०४ अन्वये निश्चित केले. आरोपीने नि. क्र. ०५ वरील निवेदनाद्वारे दोषारोप मान्य नसल्याचे कळविले आहे व संपरीक्षेची मागणी केली.

०५. मी अभियोगपक्षाचे व आरोपीच्या वतीने त्यांचे विद्वान वकीलांचे म्हणणे ऐकले व न्यायपटावरील सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले असता माझेपुढे काही मुद्दे उपस्थित होतात. सदर मुद्दे मी माझे निष्कर्षासह खालीलप्रमाणे दिले आहेत.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| **१.** | अभियोगपक्ष हे सिध्द करतो काय की, दिनांक ०७.०८.२०२४ रोजी १३:०० ते १३:४५ वाजतेच्या दरम्यान मौजा पुराडा, ता. देवरी जि. गोंदिया येथे आरोपीने फिर्यादीची मोटरसाकल एच.एफ.डिलक्स सी.जी.-जे.क्यु-६९१२किंमत ८०,०००/- रुपयाचा माल त्यांच्या संमतीशिवाय चोरून घेऊन जाण्याचा अपराध केला काय ? | नकारार्थी. |
| **२.** | अंतिम आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## <u>कारणीमिमांसा</u>

०६. अभियोगपक्षाने खटल्याच्या पृष्ट्यर्थ मात्र एक साक्षीदार तपासले आहे. फिर्यादी सा. क्र. १ टेकराम बजरहा पार्ते यास नि. क्र. ०८ वर साक्ष नोंदविली. सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी नि. क्र. १३ वर पुर्शिस दाखल करुन त्यांचा पुरावा बंद केला. अभियोगपक्षाच्या साक्षीपुराव्यात आरोपीविरुद्ध काहीही आले नसल्याने, नि. क्र. १ वर आदेश पारित करुन, भारतीय न्याय सुरक्षा संहिता कलम ३५१(१)(ब) अन्वये आरोपीचे निवेदन वगळण्यात आले.

**<u>साक्षीपुरावाः-</u>**

०७. प्रस्तुत खटल्यातील फिर्यादी सा. क्र. १ टेकराम बजरहा पार्ते याने त्याच्या सरतपासात असे कथन केले आहे की, घटना दिड वर्षापुर्वी घडली होती. तो दुचाकी वाहनाने नागपुर वरुन येत असता भंडाराला त्याने आरोपीला लिफ्ट दिली होती. त्यानंतर आरोपीने त्याला गावी सोडुन देण्यास म्हटले व त्याने त्याला घरी सोडुन दिले. तो आरोपीच्या घरी चहा पित

असतांना आरोपी त्याची गाडी घेवुन निघाला. त्यानंतर आरोपी त्याच्या घरी आला नाही.

०८. सा. क्र. १ टेकराम बजरहा पार्ते याने पुढे असे कथन केले आहे की, त्यानंतर त्याने आरोपीविरुद्ध फिर्याद दिली. त्याची गाडीचे क्र. सी. जी. ०९–जे.क्यु–६९१२ होते. सदर फिर्याद नि. क्र. ०७ वर व छापील फिर्याद नि. क्र. १० वर आहे. त्यावर त्याची सही आहे व त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. पुढे त्याने असे कथन केले आहे की, त्याला त्याची गाडी कोर्टातुन सुपुर्तनाम्यावर मिळाली आहे. सदर साक्षदाराचे आरोपीतर्फे सविस्तर उलटतपास घेण्यात आला. त्यात त्यांनी मान्य केले की, आरोपी व त्याच्या समझोता झालेला आहे. आरोपीने त्याला ७,०००/– रुपये दिले आहे. त्यामुळे त्यांना आरोपीविरुद्ध सदर खटला चालावयाची नाही.

<u>**मुद्दे क्र. १ करिताः**</u>–

०९. आरोपीवरील दोषारोप पूर्णपणे व निःसंशयपणे सिद्ध करण्याची जबाबदार अभियोगपक्षाची असते, हे फौजदारी कायद्याचे तत्व आहे. या तत्वानुसार सदर प्रकरणामध्ये आरोपीने फिर्यादीची मोटरसाकल सी. जी. –जे.क्यु–६९१२ एच. एफ. डिलक्स किंमत ८०,०००/– रुपयाचा माल त्यांच्या संमतीशिवाय चोरून घेऊन जाण्याचा अपराध केला, हे निःसंशयपूर्ण सिद्ध करणे गरजेचे आहे. उल्लेखनिय बाब म्हणजे आरोपी व फिर्यादी यांच्यामध्ये न्यायालयाबाहेर आपसी समझोता झाला असून, फिर्यादीने नि. क्र. ११ वर समझोता पुर्शिस दाखल केली आहे व त्याला प्रस्तुत खटला चालवायचा नाही असे न्यायालयास कळविले आहे. एकंदर अभिलेखावरील उपलब्ध साक्षीपुरावा आरोपीवर ठेवण्यात आलेला दोषारोप सिद्ध करण्यास उपयुक्त नाही, असे माझे मत आहे. परिणामी, मी मुद्दा क्र. १ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवून मुद्दा क्र. २ चा निष्कर्ष नोंदवण्याकरिता मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

<u>**मुद्दा क्र. २ करिताः**</u>–

१०. प्राप्त परिस्थिती व मुद्दा क्र. १ चे निष्कर्ष लक्षात घेवून मुद्दा क्र. २ चा निष्कर्ष नोंदवण्याकरिता मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. आरोपी **नितीन राजेश आचले** यांना भारतीय न्याय संहिता कलम ३०३ (२) अन्वये गुन्ह्याच्या दोषारोपातून भारतीय नागरीक

सुरक्षा सहिंता कलम २७१(१) प्रमाणे निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपी याने भारतीय नागरीक सुरक्षा सहिंता कलम ४८१–अ अन्वयेची पुर्तता केली आहे.

३. जप्त मुद्देमाल म्हणजे, एच. एफ. डिलक्स सी.जी.–जे.क्यु–६९१२ यांचा ताबा मुळ मालकास सुपुर्दनाम्यावर देण्यात आला असून त्यांचा ताबा अपिल कालावधीनंतर कायम करण्यात येतो.

४. न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by JOSHI ATUL RATNAKAR
Date: 2026.05.07 15:09:53 +0530

[ ए. आर. जोशी ]

दिनांक : ०७.०५.२०२६. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, आमगांव.